**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०५**

नगरसचिव कार्यालय
दिनांक : २२ /९/२०१७

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र - ५ मंगळवार दि. २६/ ०९/२०१७ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**मंगळवार दिनांक २६ /०९/२०१७ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| ४३ | अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी श्री. गायकवाड अरविंद शामराव यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ४४ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी भुलतज्ञ डॉक्टरांच्या पॅनलशिपवरील करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात डॉ. सायंबर व इतर १२ यांची अटी व शर्तीनुसार एक वर्षाच्या कालावधी करीता करारबध्द नियुक्ती नियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ४५ | प्रभाग क्रमांक २७ व २८ मधील शिवनेरी चौक ते स्विट कॉर्नर पर्यत परिसरातील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा कामास व रक्कम रूपये ३२,०८,२५२/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४६ | बुरूडगांव स.नं.३४ (पैकी) या ठिकाणी ५० मे.टन प्रती दिन क्षमतेच्या कचरा प्रक्रिया प्रकल्प (कंपोस्ट प्लॅट आरडीएफसह) उभारणे व ३ वर्षाकरीता देखभाल दुरूस्ती बाबत अंदाजे रक्कम रू.३.५० कोटी खर्च अपेक्षित आहे.सदर कामाची ई - निविदा मागविणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यते बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ४७ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील अपंग (दिव्यांग) व्यक्तींना विविध योजना व उपक्रमाअंतर्गत लाभ देणेबाबत मा.स्थायी समितीची मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ४८ | अर्जदार श्री.गणेश दगडू शिंदे व श्री.गोपीनाथ भाउराव कवडे यांचे अर्जानुसार त्यांना दिलेल्या जागेचे भाडेकरार वाढवून देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ४९ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ नुसार महानगरपालिकेच्या माध्यमिक विदयालया मधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ५० | पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे करीता पुर्व मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत** :- विषय क्रमांक- ४३ ते ५० च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ५**

विषय क्रमांक- ४३ मंगळवार दिनांक २६/९/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी श्री. गायकवाड अरविंद शामराव यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** आस्थापना विभाग.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की,इलेक्ट्रीक सुपरवायझर , इलेक्ट्रीक विभाग यांचे कडील जा.क्र. १४१ दिांक २१/७/२०१७ अन्वये प्रस्ताव. सादर करुन त्यामध्ये " अहमदागर महाागरपालिका इलेक्ट्रीक विभागाडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेले वरिल संदर्भ क्र.१ व २ नुसार १ वायरमन ,यांना संदर्भिय कार्यालयीन आदेश सहा महिन्याकरिता दिलेला होता.सदर वायरमन यांची कत्रांटी पध्दतीने केलेली मुदत दिनांक २/०८/२०१७ रोजी संपत आलेली आहे. तरी कायम सुचीवर १० वायरमन असुन माहे मे २०१६ महिण्यामध्ये दोन कायम वायरमन कर्मचारी सेवाावृित झालेले आहेत. त्यामुळे वायरमन ची कर्मचारी सख्या कमी असुन शहराच्या संपुर्ण शहर हद्दिमध्ये पथदिवे मेटोस करिता वायरमन ची गरज आहे. त्यामुळे मा.महापौर साहेब यांच्या दालाातील मिटीग नुसार वरिल प्रमाणे कंत्राटी करारबध्द नेमणुकीचे वायरमन वरिल संदर्भय आदेशान्वये आस्थापान विभागाने नियमानुसार कार्यवाही करुनएकुण ११ वायरमन ची नेमणुक केलेली आहे.खालील कर्मचारी यांची मुदत संपुष्टात येत आहे. त्यांची नावे

| अ क्र | कर्मचा-याचे नांव | मुदत संपण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | गायकवाड अरविंद शामराव , वायरमन | २/०८/२०१७ |

तरी अहमदागर महाागरपालिका इलेक्ट्रीकल विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या १ वायरमन यांची मुदत दि ०२/०८/२०१७ व वरील संदर्भिय आदेशाासार संपत असल्याने त्यांना ६ महीयाकरिता पुनश्च मुदतवाढीस तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन मंजुरी मिळणेस व आस्थापाना विभागामार्फ़त मुदत वाढीचे कार्यालयीन आदेश काढण्यास असे नमुद कलेले असुन मा.उपायुक्त (कर) उपरोक्त नुसार मान्यतेस्तव सादर" असा अभिप्राय दिलेला आहे.

तरी श्री .गायकवाड अरविंद शामराव यांचा आस्था जा क्र ३२७ दिांक २६/०४/२०१७ अवये दिनाक ०२/२/२०१७ ते ०२/०८/२०१७ अखेर तात्पुरत्या नियुक्ती कालावधी दिांक २/८/२०१७ रोजी समाप्त

झालेला असुन जा.क्र. इलेक्ट्रीक विभाग १४१ दिांक २१/०७/२०१७ रोजीच्या अहवालाच्या अनुषगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करार नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन या पदी श्री गायकवाड अरविंद शामराव यांना तिन दिवसाचा तंत्रिक खंड देवुन दिनांक ७/८/२०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये ९,५००/- या दरमहा माधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीची निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे प्र.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय असे.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ व ब नुसार तसेच कामगार अधिकारी यांचे अभिप्रायास अधीन राहून कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी. यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी श्री. गायकवाड अरविंद शामराव यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.सचिन जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.संजय शेंडगे :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ४३,४४,५० हे पुर्ननियुक्ती असून या विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सौ.उषा नलवडे :- सर्व पुर्ननियुक्ती करणे बाबतचे विषयास मंजूरी देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- विषय क्र.४३,४४,५० हे विषय अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी श्री. गायकवाड अरविंद शामराव यांना तीन दिवसाचा तंत्रिक खंड देवुन दिनांक ७/८/२०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये ९,५००/- या दरमहा माधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर नियमानुसार प्रढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ५**

विषय क्रमांक- ४४ मंगळवार दिनांक २६/९/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी भुलतज्ञ डॉक्टरांच्या पॅनलशिपवरील करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात डॉ. सायंबर व इतर १२ यांची अटी व शर्तीनुसार एक वर्षाच्या कालावधी करीता करारबध्द नियुक्ती नियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपलिका आस्थापना विभाग.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी, यांचे कडील कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह जा.क्र३१४ दिनांक २८/६/२०१७ अन्वयेचा प्रस्ताव सादर करुन " कै.बा.दे.दवाखाना येथे गरोदर स्त्रीयांचे सिझरेयीन आपरेशन करतांना भुलतज्ञांची आवश्यकता असल्याने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ९ ठराव क्र १२६ दिनांक १६/१२/२०१४ ने जा.आस्थापना ८१३१ दिनांक २४/०२/२०१५ अन्वये तीन वर्षाकरिता १३ भुलतज्ञांची पॅनलशिपवर मानधनावर नेमणुक करण्यात आलेली असुन सदरची मुदत ५/७/२०१७ रोजी संपत आहे.

तसेच कै.बा.दे.दवाखान्याची गैरसोय होऊ नये म्हणुन वरील प्रमाणे या पॅनलवरील भुलतज्ञ डॉक्टरांचा दिनांक ०५/०७/२०१७ रोजी कालावधी संपण्या आगोदर शहरातील इच्छुक ३ भुलतज्ञ डॉक्टरांची मानधनावर पुर्णवेळ नेमणुक करणेकामी मंजुर प्रस्ताव जा.क्र.कै.बा.दे.दवाखाना २४७ दिनांक १२/०६/२०१७ ने आस्थापना विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे.आस्थापना विभागाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावावर दिनांक ०५/०७/२०१७ पुर्वी कार्यवाही न झालेस व भुलतज्ञ डॉक्टरांच्या पॅनलचा कालावधी संपल्यानंतर दवाखान्यामध्ये भुलतज्ञ डॉक्टरांची अडचण निर्माण होणार आहे.व त्यामुळे अत्यावश्यक शस्त्रकिया करणेकरिता भुलतज्ञ डॉक्टरां अभावी गैरसोय होणार आहे.असे नमुद केलेले आहे.

आस्थापना जा.क्र ८१३१ दिनांक २४/२/२०१५ अन्वये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात खालील दर्शनिले भुलतज्ञ डॉक्टर यांची व्हीजीट बेस्वर पॅनलशिपवर अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली होती. भुलतज्ञ यांचे नांव

| अ. न | भुलतज्ञ यांचे नांव |
|---|---|
| १ | डॉ.सौ.सायंबर |
| २ | डॉ.श्री .सचिन लांडगे |
| ३ | डॉ.श्री.मिलिंद पोळ |
| ४ | डॉ.श्री.शशांक मोहळे |
| ५ | डॉ.श्री.महादेव रंधाळे |
| ६ | डॉ.श्री.शिरीष कुलकर्णी |
| ७ | डॉ.सौ.संगिता कुलकर्णी |
| ८ | डॉ.श्री.के.टी.कलवाणी |
| ९ | डॉ.सौ.दिपाली फ़लके |
| १० | डॉ.सौ.प्रतिभा आर.भोसले |
| ११ | डॉ.श्री.संदीप नळे |
| १२ | डॉ.दिपमाला भारत महींद्रकर |

उपरोक्त पॅनलशिपवर ( मानधनावर) नेमणुक करण्यात आलेली मुदत ५/७/२०१७ रोजी संपत असुन तदनंतर जा.क्र.आस्था.१४५९ दि.८/६/२०१६ अन्वये श्री.कृष्णाजी अनारसे, यांची दिनांक १/७/२०१६ ते

५/७/१७ भुलतज्ञ म्हणुन पॅनलशिपवर नेमणुक करण्यात आलेली असुन सदर नेमणुकीचा कालावाधी ही दिनांक ५/७/२०१७ रोजी समाप्त झालेला आहे.

मुख्य वैद्यकिय अधिकारी यांचा उपरोक्त प्रस्ताव पहाता कै बा.दे. दवाखान्यामध्ये भुलतज्ञांची नियुक्ती वेळत न झाल्यास अडचण निर्माण होवुन शस्त्रकिया करणेकरिता भुलतज्ञ डॉक्टरां अभावी गैरसोय होवुन नाहक नागरीकांच्या रोषास सामोरे जावे लागेल.

तसेच मा. सभापती, स्थायी समिती यांनी पत्र देवुन कै.बा.दे.दवाखाना अत्यावश्यक सेवे करीता ऑम कॉल बेसीसवर भुलतज्ञ डॉक्टरांची मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी गृहीत धरुन त्यांना पुर्ननियुक्ती देणे बाबत शिफारस केलेली आहे.

तरी उपरोक्त परिस्थीती व मुख्य वैद्यकिय अधिकारी यांचा प्रस्ताव पहाता कै.बा.देदवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात भुलतज्ञ या पदी पॅनलशिपवर उपरोक्त तकत्यात नमुद १२ व श्री .आनारसे, भुलतज्ञ यांची प्रत्येक मॅयनर ऑपरेश करीता रु ५००/-, मेजर ऑपरेशन करीता रु.१०००/- नाईट ॲण्ड हायरिस्क केसेस करीता रु.१५००/- या प्रमाणे ऑन कॉल बेसीसवर अटी व शर्तीनुसार दिनांक १०/७/२०१७ ते ९/७/२०१८ अखेर नियुक्ती देणे बाबत मुख्य लेखा अधिकारी तथा लेखा परिक्षक यांचा अभिप्राय घेवुन नियुक्ती देण्यात यावी, मा.स्थायी सभापती यांनी त्यास सहमती दर्शवली आहे.तसेच मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी घेण्यात येईल.तथापी आदेशार्थ सादर.

यणे प्रमाणे प्रभाग अधिकारी तथा प्र.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय असे,

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मुलेप यांच्या मार्फत सादर करावे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावित नमुद केल्यानुसार जा.नं.आस्था ८१३१दि.२४/२/२०१५ ते तीन वर्षासाठी मानधनावर नियुक्ती केल्याचे दिसुन येते.प्रस्तावित कालावधी हा तीन वर्ष लक्षात घेता दि.२३/२/१८ राजी समाप्त होत आहे.सबब खात्री करून फेरसादर करा.

मागील पृष्ठवरील ब बाबत तीन वर्षाचा कालावधी निश्चित करावा.पुर्तता सह फेरसादर करावे.

यावर प्र.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,फेर सादर, आपल्या कडील दिनांक २५/७/२०१७ शंकेकानुसार अहवाल फेर सादर करण्यात येतो की,जा.क्र, आस्था ८१३१ दि.२४/२/२०१७ रोजीच्या आदेशान्वये भुलतज्ञ डॉक्टरांची पॅनलशिपवर दिनांक ०६/०७/२०१४ ते ०५/०७/२०१७ अखेर ३ वर्षासाठी नियुक्ती करण्यात आलेली असून सदर नियुक्तीचा कालावधी दि.५/७/२०१७ रोजी समाप्त झाला आहे.

तरी अत्यावश्यक सेवा असल्यामुळे प्रस्ताव मंजूर करणेस हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,फेरसादर खुलासा पहाता मुळ प्रस्तावान्वये पॅनेलशिपवर केसेस प्रमाणे दि.१०/७/२०१७ ते ९/७/१८ अखेर १ वर्षाकरीता भुलतज्ञांची नेमणूक करणेस पुढे निर्णयास्तव ठेवणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, उपरोक्त ब प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी श्री. गायकवाड अरविंद शामराव यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.सचिन जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्रीमती कलावती शेळके :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ४३,४४,५० हे पुर्ननियुक्ती असून या विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सौ.उषा नलवडे :- सर्व पुर्ननियुक्ती करणे बाबतचे विषयास मंजूरी देण्यात यावी.

मा.उपायुक्त श्री.चव्हाण :- मा.सभापती साहेब,एक विषय असा होता.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची ड प्रकरण आठ,कराधान नियम ४७ (७) नुसार जप्त केलेल्या मालमत्तेचा जाहीर लिलाव करणेबाबत चा विषय आजच्या सभेत घेण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- काय विषय आहे.या बाबत सविस्तर माहिती सांगा.

मा.उपायुक्त श्री.चव्हाण :- महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता धारकांवर मालमत्ता कराची रक्कम मुदतीत भरणे बंधनकारक आहे.मालमत्तेची मागणी बील देवूनही काही मालमत्ता धारक कर भरत नाही.त्यानुसार अधिनियमातील तरतुदी नुसार अधिपत्र बजावणी करूनही २१ दिवसांच्या आत कराचा भरणा केला नाही तर नियम ४७ नुसार जप्त करण्यात आलेली मालमत्ता विक्री करता येईल,अशी तरतुद आहे.त्यानुसार अद्यापपावेतो एकुण ६ मालमत्ता जप्त करूनही कराचा भरणा केलेला नाही.त्यामुळे त्यांची विक्री करण्याची कार्यवाही सुरू केलेली आहे.त्यानुसार उक्त अधिनियमातील नियम ४७(७) नुसार विक्रीसाठी काढलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या बाबतीत महानगरपालिकेच्या वतीने मा.आयुक्तांनी बोली बोलणे कायदेशीर असेल,परंतु अशी बोलण्यासाठी मा.स्थायी समितीची पुर्व मान्यता आवश्यक आहे.अशी तरतुद आहे.

मा.श्रीमती कलावती शेळके :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची ड प्रकरण आठ,कराधान नियम ४७ (७) नुसार जप्त केलेल्या मालमत्तेचा जाहीर लिलाव करणे व आयुक्त किंवा उपायुक्त (कर) यांना प्रधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती देण्या बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.उषा नलवडे:- मा.उपायुक्त यांनी मांडलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- विषय क्र.४३,४४,५० हे विषय अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे. तसेच सभेमध्ये मा.उपायुक्त यांनी सादर केलेला प्रस्ताव तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची " ड " प्रकरण आठ,कराधान नियम ४७ (७) नुसार जप्त केलेल्या मालमत्तेचा जाहीर लिलाव करणे कामी रक्कम रू.१.००/- नाममात्र बोली बोलण्यासाठी आयुक्त किंवा उपायुक्त (कर) यांना प्रधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चे नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी भुलतज्ञ डॉक्टरांच्या पॅनलशिपवरील करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात डॉ. सायंबर व इतर १२ यांची दि.१०/७/२०१७ ते ९/७/१८ अखेर अटी व शर्तीनुसार एक वर्षाच्या कालावधी करीता करारबध्द नियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर

तसेच सभेमध्ये सादर केलेल्या प्रस्तावावर झालेल्या चर्चे नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची " ड " प्रकरण आठ,कराधान नियम ४७ (७) नुसार जप्त केलेल्या मालमत्तेचा जाहीर लिलाव करणे कामी रक्कम रू.१.००/- (रक्कम रूपया एका मात्र) नाममात्र बोली बोलण्यासाठी आयुक्त किंवा उपायुक्त (कर) यांना प्रधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यास व ऑफिस रिपोर्टमधील नमूद प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

अनुमोदक :- मा.श्रीमती कलावती शेळके सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ५**

विषय क्रमांक- ४५ मंगळवार दिनांक २६/९/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग क्रमांक २७ व २८ मधील शिवनेरी चौक ते स्विट कॉर्नर पर्यत परिसरातील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा कामास व रक्कम रूपये ३२,०८,२५२/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** सार्वजनिक बांधकाम विभाग.

१. विषयांकीत काम प्रशासकीय आहे.विषयांकीत काम मा.सभागृह नेता श्री.अनिल माधवराव शिंदे यांनी यादी देवून सुचविले आहे.
२. सदर कामाची कनिष्ठ अभियंता,यांनी कामाची पहाणी केली
३. सदर कामाची अंदाजपत्रकीय तरतूद खालील प्रमाणे आहे.

लेखाशिर्षक :- मा.महापौर शहर विकास निधी सन २०१७/२०१८ पान नं.अ.नं.७

तरतुद :- रू.३,००,००,०००/-

यापुर्वीचा खर्च :- ३१९२२९०/-

एकुण खर्च :- रू.७२,९३,२०१/-

शिल्लक :- रू.२,२७,०६,७९९/-

४. कामाची निकड :- सदर भागात भागातील रस्ता खराब आहे.काम प्रस्तावित करण्यात आले आहे.
५. कामाचा वाव :- मजबुतीकरण व डांबरीकरण
६. दरसुची :- सा बा वि दरसुची २०१५-१६

तरी रक्कम रूपये ३२,०८,२५२/- चे कामास व मा.महापौर शहर विकास निधी अंतर्गत प्रशासकीय मान्यतेसाठी मा.स्थायी समिती कडे पाठविणेस तथा ई निविदा काढणे व त्याकामी येणा-या खर्चास मंजूरीस्तव प्रस्ताव सादर. येणे प्रमाणे कनिष्ठ अधियांता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समिती समोर प्रशासकिय मान्यतेस्तव सादर करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय कि,मागील दायीत्व आहे.शहरअभियंता यांचे निदर्शनास आणले आहे.पुढील कामे शहर अभियंता यांचे जबाबदारीव प्रस्तावित झाली.असलेने योग्य त्या कार्यावाहीस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,बांधकाम विभागाने तरतुदची खात्री करावी.तसेच भविष्यात दायीत्व निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची स्वाक्षरी

यावर मा.अतिरिक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,उपरोक्त अहवालाप्रमाणे अंदाजपत्रकामधील तरतुदीसअधिन राहून मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक २७ व २८ मधील शिवनेरी चौक ते स्विट कॉर्नर पर्यत परिसरातील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा कामास व रक्कम रूपये ३२,०८,२५२/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.सचिन जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.उषा नलवडे :- ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक २७ व २८ मधील शिवनेरी चौक ते स्विट कॉर्नर पर्यत परिसरातील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा कामास व रक्कम रूपये ३२,०८,२५२/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २७ व २८ मधील शिवनेरी चौक ते स्विट कॉर्नर पर्यत परिसरातील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा कामास व रक्कम रूपये ३२,०८,२५२/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत च्या ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार प्रढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ५**

विषय क्रमांक- ४६ मंगळवार दिनांक २६/९/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** बुरूडगांव स.नं.३४ (पैकी) या ठिकाणी ५० मे.टन प्रती दिन क्षमतेच्या कचरा प्रक्रिया प्रकल्प (कंपोस्ट प्लॅट आरडीएफसह) उभारणे व ३ वर्षाकरीता देखभाल दुरूस्ती बाबत अंदाजे रक्कम रू.३.५० कोटी खर्च अपेक्षित आहे.सदर कामाची ई - निविदा मागविणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यते बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग.

उपरोक्त विषयाबाबत सादर करण्यात येते की,मा.राष्ट्रीय हरित लवाद,पुणे यांचे दिनांक ०८/०८/२०१४ चे आदेशानुसार मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत बुरूडगांव स.नं.३४ (पैकी) या ठिकाणी खत प्रकल्प उभारणे व देखभाल दुरूस्ती करणे करीता खाजगी एजन्सी नियुक्ती करणे बाबत निविदा मागविण्यात आल्या होत्या.त्यानुसार पी.एच.जाधव या एजन्सीची नियुक्ती करण्यात आली आहे.सदर एजन्सीच्या कामाचे स्वरूप खालील प्रमाणे होते.

१. बुरूडगांव स.नं.३४ येथे स्वखर्चाने कचरा प्रकल्प उभारणे.
२. बुरूडगांव स.नं.३४ येथे येणा-या मिश्र स्वरूपाच्या कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे व उर्वरित इनर्ट मटेरीयल सॅनेटरी लॅण्ड फिल पर्यत पोहोच करणे.
३. बुरूडगांव स.नं.३४ येथे स्वखर्चाने कचरा प्रक्रिया प्रकल्प देखभाल दुरूस्ती करणे.
४. बुरूडगांव स.नं.३४ येथे स्वखर्चाने कचरा प्रक्रियेच्या प्रकल्पाच्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करणे व येणारे लाईट बिल अदा करणे.

मनपा मार्फत प्रकल्पाच्या ठिकाणी खालील प्रमाणे सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

१. मान्सुम शेड
२. विन्ड्रो कंपोस्ट प्लॅट फॉर्म
३. मशिनरी बसविणेसाठी आवश्यक ती फौडेशनची कामे.

सदर एजन्सीस दिनांक १०/०७/२०१५रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले होते व प्रत्यक्ष देखभाल दुरूस्तीचे काम दिनांक १६/१०/२०१५ पासून चालू आहे.करारनाम्यानुसार प्रकल्प चालविणेचा कालावधी २ वर्ष इतका आहे व प्रकल्पाची मुदत दिनांक १५/१०/२०१७ रोजी संपुष्टात येत आहे.सदर प्रकल्प चालविणे करीता मनपा मार्फत आउटपुट बेसीसवर रक्कम रू.१९००/- प्रती मे.टन या प्रमाणे दर महिन्याला खताचे मोजमाप घेवून देयक अदा करण्यात येत आहे.सदर एजन्सी मार्फत मनपास विक्री केलेल्या खतावर १०%रॉयल्टी बिलातुन कपात करण्यात येत आहे.

तरी सदर एजन्सी मुदत दिनांक १५/१०/२०१७ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे पुढील ३ वर्ष कालावधी स्वखर्चाने मशिनरी बसविणे व प्रकल्प चालविणे करीता निविदा मागवून एजन्सीची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

सदर प्रकल्प ३ वर्षाकरीता देखभाल दुरूस्ती बाबत अंदाजे रक्कम रू.३.५० कोटी खर्च अपेक्षित आहे.तरी सदर कामाची ई - निविदा मागविणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता घेणेस्तव मा.स्थायी समितीकडेस सादर करणे रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप - अभियंता प्रकल्प विभाग यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस सादर करणे योग्य

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,निविदा अटी व शर्ती मध्ये GST क्रमांक अट आहे.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,सोबतच्या अहवालानुसार मान्यतेस्तव मा.स्थायी समितीकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- बुरूडगांव स.नं.३४ (पैकी) या ठिकाणी ५० मे.टन प्रती दिन क्षमतेच्या कचरा प्रक्रिया प्रकल्प (कंपोस्ट प्लॅट आरडीएफसह) उभारणे व ३ वर्षाकरीता देखभाल दुरूस्ती बाबत अंदाजे रक्कम रू.३.५० कोटी खर्च अपेक्षित आहे.सदर कामाची ई - निविदा मागविणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यते बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री. सचिन जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- ५० मे.टन क्षमतेचा प्रकल्प यापुर्वी उभारला होता.सन २०१५ ऑक्टोंबर मध्ये कार्यान्वीत झाला होता.त्याचा फॉमॅट असा होती की आपण सर्व सिव्हील वर्क आपण करून दयायचे.त्यासाठी लागणारी त्या एजन्सीने मशिनरी बसवायची.दोन वर्षा करीता आपण टेंडर दिले होते.आता त्याची दोन वर्षाची मुदत संपली आहे.पुढील तीन वर्षा करीता पी.पी.टी मोडवर हे टेंडर काढले आहे.या ठिकाणी स्थापत्य सर्व कामे आपण करून दिली आहेत.आता जी एजन्सी येईल त्या एजन्सीने तो प्लॅन्ट स्वखर्चाने बसवायचा आहे.प्रोसेसिंग आणि आर.डी.एफ करायची आहे.आपण त्याला आउटपुट बेसवर ओ एन डी साठी पैसे देणार आहे.अशा स्वरूपाचे टेंडर आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- अंदाजे कीती रूपयांची मशीनरी या प्लॅन्ट करीता लागणार आहे.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- आर.डी.एफ.सह धरल्यास अंदाजे तीन कोट रूपयांची मशिनही आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- तीन कोटी रूपयांच्या मशिनरी ठेकेदार एजन्सीला घ्यावी लागेल.तीन वर्षा नंतर दुसरा ठेकेदार आल्यावर काय कारणार.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- तीन वर्षा नंतर पुन्हा टेंडर काढणार.मशिनरी मध्ये आपण यापुर्वी गुंतवणूक केलेली नाही.मशिनरी मध्ये आपण गुंतवणूक केली उदया जर ठेकेदार निघून गेल्यावर आर्थिक तोटा होवू शकतो.

मा.श्री.दिलीप सातपुते :- आपण मशिनरी मध्ये गुंतवणूक करायची नाही.तीन वर्षा करीता ठेकेदार तीन कोटींची मशिनरी घेणार ,त्याचे तीन वर्षा मध्ये पैसे वसूल झाले नाही.परत टेंडर कढले ते टेंडर दुस-याने घेतले तर पुर्वीच्या ठेकेदार त्याची मशिनरी काढून घेणार का.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- हो काढून नेणार आज पण हिच पध्दत आहे.ज्या ठेकेदाराची मुदत संपली तो ठेकेदार त्याची मशिनरी काढूनच नेणार.

मा.श्री.सचिन जाधव :- या कामा करीता दहा वर्षाचे टेंडर काढा.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- हा ठेकेदाराचा प्रश्न आहे.तो मशिनरी काढीन नाहीतर येणा-या ठेकेदाराला देईल.

मा.श्री.दिलीप सातपुते :- या कामा करीता टेंडर कोणी भरतील का.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- हो भरतील,

मा.श्री.दिलीप सातपुते :- तीन वर्षामध्ये त्याची रिकव्हरी होवू शकते का.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- आपण प्रती मे.टन चे रेट मागवीले आहे.त्यामध्ये जे लघुत्तम दर असेल त्याला काम देणार.

मा.श्री.सचिन जाधव :- कमी कमी पाच वर्षा करीता टेंडर काढा.

मा.श्रीमती कलावती शेळके :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.प्रस्तावातील ३ वर्ष कालावधी ऐवजी ५ वर्षाचा कालावधी नमुद करून स्वखर्चाने मशिनरी बसविणे व प्रकल्प चालविणे करीता निविदा मागवून एजन्सीची नियुक्ती करणे बाबत कार्यवाही करावी.

मा.सौ.उषा नलवडे :- सदर प्रकल्प ५ वर्षाकरीता देखभाल दुरूस्ती सह कामाची ई - निविदा मागविणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- बुरूडगांव स.नं.३४ (पैकी) या ठिकाणी ५० मे.टन प्रती दिन क्षमतेच्या कचरा प्रक्रिया प्रकल्प (कंपोस्ट प्लॅट आरडीएफसह) उभारणे व ५ वर्षाकरीता देखभाल दुरूस्ती बाबत येणा-या अंदाजे रक्कमेस व सदर कामाची ई - निविदा मागविणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** सभागृतात झालेल्या चर्चे नुसार बुरूडगांव स.नं.३४ (पैकी) या ठिकाणी ५० मे.टन प्रती दिन क्षमतेच्या कचरा प्रक्रिया प्रकल्प (कंपोस्ट प्लॅट आरडीएफसह) उभारणे व ५ वर्षाकरीता देखभाल दुरूस्ती बाबत येणा-या अंदाजे रक्कमेस व सदर कामाची ई - निविदा मागविणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार प्रढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्रीमती कलावती शेळके सही /-

अनुमोदक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ५

विषय क्रमांक- ४७ मंगळवार दिनांक २६/९/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील अपंग (दिव्यांग) व्यक्तींना विविध योजना व उपक्रमाअंतर्गत लाभ देणेबाबत मा.स्थायी समितीची मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका उपायुक्त /पी.ए./साप्रवि

**वाचा** :- ०१.विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५.
०२.शासन निर्णय क्र.संकीर्ण - २०१५/प्र.क्र.११८/नवि - २० दि.२८-१०-२०१५.

**प्रस्तावना :** केंद्र शासनाने अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी अपंग व्यक्तींसाठी समान संधी, संरक्षण व समान सहभाग कायदा, १९९५ दि.०१-०१-१९९६ पासून लागू केला आहे. सदर कायद्यातील कलम ४० अवन्ये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अपंगांसाठी किमान ३% निधी राखीव ठेवण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत, व सदर निधी कोणकोणत्या प्रयोजनार्थ खर्च करता येईल याबाबत उपरोक्त शासन निर्णया अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत.

अहमदनगर शहरातील अपंग व्यक्तींचा सर्वे करण्यात आला असून किमान ४०% अपंगत्व असलेल्यांची संख्या ४९४ आहेत. सदर सर्वे अंतीम नसून नव्याने सापडलेल्या अपंग व्यक्तींची सुध्दा नोंद घेण्यात येत आहे.

उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने व महानगरपालिका ३% निधी (रक्कम रु.११३ लक्ष) चा विचार करता खालीलप्रमाणे धोरण राबविणे करीता प्रस्तावित करण्यात येत आहे. मुख्य सभेने सदर ३ % निधी अर्थसंकल्पीय तरतुदीअन्वये मंजूर केलेला आहे. सदर वित्तीय तरतुदीच्या अंतर्गत खालील उपक्रमांच्या आर्थिक मर्यादा ठरविण्याबाबत मा.स्थायी समितीची मंजूरी अपेक्षित आहे.

**०१. <u>मासिक उदरनिर्वाह अनुदान देणे :-</u>**

उपरोक्त शासन निर्णया नुसार , अपंगांच्या मागणी नुसार त्यांना उदरनिर्वाह देणे अपेक्षित आहे. (क्र. ३) तथापि सर्व अपंगांकरीता एक समान धोरण, त्यांच्या अपंगत्वाच्या टक्केवारी नुसार असणे प्रशासकीय दृष्ट्या सोयीस्कर होणार असल्याो खालील तक्त्यानुसार मासिक उदरनिर्वाह अनुदान प्रस्तावित करण्यांत येत आहे.

तसेच उपरोक्त शासन निर्णयानुसार ८० ते १०० % अपंगत्व असलेल्यांना प्राधान्य देण्याचे निर्देश आहेत, कारण सदर व्यक्तींना शासनाच्या इतर उपक्रमांचा लाभही घेता येत नाही व त्यांना सर्व अर्थाने त्यांचे पालकत्व स्विकारणा-यांवर सर्वस्वी अवलंबून रहावे लागते, त्यामुळे त्यांना इतर अपंगांच्या तुलनेतअधिक अनुदान देणे क्रमप्राप्त व संयुक्तीक आहे.

| अ.-नं.. | अपंगत्व % | अपंगांची संख्या | प्रति लाभार्थी मासिक अनुदान | एकुण मासिक खर्च | वार्षिक खर्च |
|---|---|---|---|---|---|
| अ | ८० - १००% | ७५ | ३००० | २,२५,००० | २७,००,००० |
| ब | ६० - ७९% | १२४ | १००० | १,२४,००० | १४,८८,००० |
| क | ४० - ५९% | २९५ | ५०० | १,४७,५०० | १७,७०,००० |
| | | | | ४,९६,५०० | ५९,५८,००० |

०२. उपरोक्त उदरनिर्वाह अनुदान व्यतिरिक्त उर्वरीत रक्कम रु.५३,४२,०००/- ही खालील प्रयोजनार्थ वाटप करणे.

(अ) पंतप्रधान आवास योजनेमध्ये अपंग लाभार्थींना रक्कम रु.२,५०,०००/- अनुदान देणे (शासकीय अनुदाना व्यतिरिक्त)

(ब) व्यवसाय सुरु करण्याकरीता रक्कम रु.५०,०००/- अनुदान देणे.

(क) उपरोक्त शासन निर्णयातील इतर प्रयोजनार्थ खर्च करणे.

०३. वर्षाच्या १५ मार्च अखेर अ.नु.क्र. २ मधील अखर्चीत रक्कम ही स्वतंत्र बँक खात्यामध्ये ३१ मार्च पूर्वी जमा करणे जेणेकरुन शिल्लक रक्कम ही पुढील वर्षांमध्ये अपंगांकरीता वापरता येईल.

०४. उपरोक्त ३% निधी जमा करण्याकरीता स्वतंत्र बँक खाते उघडण्यात यावे. ३% निधीचे समान १० हिस्से करुन दरमहा सदर होणारी रक्कम त्या खात्यात जमा करणे.

०५. मासिक अनुदानाचा चेक हा महानगरपालिकेच्या इतर कर्मचा-यांच्या पगारा सोबतच करण्यात यावा.

०६. महानगरपालिकेच्या स्वतःच्या मुदत ठेव निधीच्या व्याजाची रक्कम उपरोक्त ३% निधीच्या पुर्ततेसाठी वापरण्यात यावा.

०७. उपरोक्त योजना राबविणेकरीता महानगरपालिकेमध्ये स्वतंत्र सेल निर्माण करण्यात यावा, तो पर्यंत NULM विभागाने सदर योजना राबवावी. कारण त्यांनी अपंगांचा सर्व्हे केला असून, त्यांचे NULM च्या उपक्रमांची अपंगांच्या व्यवसाय व बँक प्रकरण करण्यात मदत होईल. सदर काम बघणारे NULM च्या कर्मचा-यांच्या कामकाजा व्यतिरिक्त हे काम असल्यांने त्यांना प्रोत्साहनपर रक्कम रु.२,०००/- प्रतिमहा देण्यात यावा, कारण सदर कर्मचारी हे सध्या खुप कमी मानधनावर काम करत आहेत.

०८. दर वर्षी अपंगांच्या मानधनात किमान १०% वाढ करण्यात यावी. सदर वाढीचा अतिरिक्त बोजा महानगरपालिकेवर पडणार नाही, कारण ही वाढ उपरोक्त ३% निधीच्या मर्यादेतच होणार आहे, ३% निधीच्या वर महानगरपालिकेचा खर्च होणार नाही. सदर ३% निधीमध्येही दर वर्षी महानगरपालिकेच्या अर्थ संकल्पाप्रमाणे वाढ होणे अपेक्षित आहे.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत अपंगांच्या शिक्षणाकरीता भरीव तरतूद असल्याने त्यावर खर्च करण्याचे प्रस्तावित केलेले नाही.

मा.आमदार श्री.बच्चू कडू यांच्या संस्थेतर्फे राज्यभर विषयांकित उपक्रमांची अंमलबजावणी होणे करीता आंदोलन सुरू आहे, व त्याबाबत त्यांनी आपल्या महानगरपालिकेलाही अवगत केले आहे. विधानसभेतही हा प्रश्न गांभीर्याने चर्चिला गेलेला आहे. २२ वर्षापुर्वी विषयांकित कायदा अस्तित्वात आला असुन देखील त्याची ख-या अर्थाने अंमलबजावणी अद्याप झालेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

तरी दिव्यांग (अपंग) व्यक्तींना स्वावलंबी जीवन जगणे, तसेच त्यांच्यात चैतय निर्माण करणेकामी त्यांना थेट लाभ मिळण्याकरीता वरील विविध उपक्रमाअंतर्गत धोरणात्मक निर्णय घेणे करीता मा.स्थायी समितीकडे शिफारस करण्यात येत आहे. मुख्य सभेने अर्थ संकल्पात सदर उपक्रमाकरीता ३% निधी (रु.११३ लक्ष) मंजुर केलेला आहे./**अ**

येणेप्रमाण्पे उप-उपायुक्त (कर) यांचा रिपोर्ट असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा सहमती दर्शक सही

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, नगर विकास विभाग शासन निर्णय दि. १ ऑक्टेंबर २०१५ मधील ३ % अपंगासाठी राखीव निधीतून शासन निर्णयातील खर्च करावयाचे १ ते १८ बाबीवर खर्च करण्याच्या मार्गदर्शन सुचना दिल्या असुन त्यानुसार प्रस्तावीत बाबीच्या खात्री विभागाने करून मा. स्थायी समितीचा मान्यता घेणे उचित राहील. तसेच प्रहार अपंग क्रांती आंदोलन यांचे दिनांक १४/८/२०१७ रोजी पत्रातील "ब" मध्ये नमुद केल्याप्रमाणे अंपगत्व संगणकीकृत प्रमाणपत्र धारकास योजनेच्या काम देता येईल यांची विभागाने खात्री करावी.

यावर मा. अतिरिक्त आयुक्त यांचा अभिप्राय की, उपरौकत प्रस्तावामधील "अ" व "ब" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अपंग (दिव्यांग) व्यक्तींना विविध योजना व उपक्रमाअंतर्गत लाभ देणेबाबत मा.स्थायी समितीची मंजुरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. सचिन जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. सचिन जाधव :- या योजने बाबत सविस्तर महिती सांगा.

मा.उपायुक्त (कर) श्री.चव्हाण :- शासन निर्णयानुसार ८० ते १०० % अपंगत्व असलेल्यांना प्राधान्य देण्याचे निर्देश आहेत, कारण सदर व्यक्तींना शासनाच्या इतर उपक्रमांचा लाभही घेता येत नाही व त्यांना सर्व अर्थाने त्यांचे पालकत्व स्विकारणा-यांवर सर्वस्वी अवलंबून रहावे लागते, त्यामुळे त्यांना इतर अपंगांच्या तुलनेतअधिक अनुदान देणे क्रमप्राप्त व संयुक्तीक आहे. त्यातील ८० ते १००% अपंगत्व असणा-या लाभार्थीस मासिक अनुदान रू.३०००/-,६० ते ७९ % अपंगत्व असणा-या लाभार्थीस मासिक अनुदान रू.१०००/-,४० ते ५९ % अपंगत्व असणा-या लाभार्थीस मासिक अनुदान रू.५००/- प्रस्तावित केले आहे. ०२. उपरोक्त उदरनिर्वाह अनुदान व्यतिरिक्त उर्वरीत रक्कम रु.५३,४२,०००/- ही खालील प्रयोजनार्थ वाटप करणे.,पंतप्रधान आवास योजनेमध्ये अपंग लाभार्थींना रक्कम रु.२,५०,०००/- अनुदान देणे ,व्यवसाय सुरु करण्याकरीता रक्कम रु.५०,०००/- अनुदान देणे. उपरोक्त शासन निर्णयातील इतर प्रयोजनार्थ खर्च करणे. वर्षाच्या १५ मार्च अखेर अ.नु.क्र. २ मधील अखर्चीत रक्कम ही स्वतंत्र बँक खात्यामध्ये ३१ मार्च पूर्वी जमा करणे जेणेकरुन शिल्लक रक्कम ही पुढील वर्षांमध्ये अपंगांकरीता वापरता येईल.उपरोक्त ३% निधी जमा करण्याकरीता स्वतंत्र बँक खाते उघडण्यात यावे. ३% निधीचे समान १० हिस्से करुन दरमहा सदर होणारी रक्कम त्या खात्यात जमा
करणे. उपरोक्त योजना राबविणेकरीता महानगरपालिकेमध्ये स्वतंत्र सेल निर्माण करण्यात यावा, तो पर्यंत NULM विभागाने सदर योजना राबवावी. कारण त्यांनी अपंगांचा सर्व्हे केला असून, त्यांचे NULM च्या उपक्रमांची अपंगांच्या व्यवसाय व बँक प्रकरण करण्यात मदत होईल. सदर काम बघणारे NULM च्या कर्मचा-यांच्या कामकाजा व्यतिरिक्त हे काम असल्यांने त्यांना प्रोत्साहनपर रक्कम रु.२,०००/- प्रतिमहा देण्यात यावा, दर वर्षी अपंगांच्या मानधनात किमान १०% वाढ करण्यात यावी. सदर वाढीचा अतिरिक्त बोजा महानगरपालिकेवर पडणार नाही, कारण ही वाढ उपरोक्त ३% निधीच्या मर्यादेतच होणार आहे, ३% निधीच्या वर महानगरपालिकेचा खर्च होणार नाही. सदर ३% निधीमध्येही दर वर्षी महानगरपालिकेच्या अर्थ संकल्पाप्रमाणे वाढ होणे अपेक्षित आहे.

शासन निर्णयानुसार प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव ठेवण्यात आला आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- महानगरपालिकेने ३% निधी अर्थसंकल्पीय तदतुदी नुसार म्हणजे किती निधी यावर खर्च करता येणार आहे ?

मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- ३% निधी म्हणजे रू.११३ लक्ष अर्थसंकल्पामध्ये मंजूर केला आहे.

मा.सौ.सुनिता फुलसौंदर :- कोणकोणत्या महानगरपालिकेमध्ये या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे ?

मा.उपायुक्त (कर) श्री.चव्हाण :- महाराष्ट्रातील वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- प्रस्तावामध्ये नमुद केल्या नुसार अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातील अपंगांसाठी सेवा उपलब्ध करून देण्यात यावी.

मा.सौ.उषा नलवडे :- ऑफिस रिपोर्ट नुसार योजनेच्या सर्व प्रवर्गातील लाभार्थी करीता अटी व शर्ती प्रमाणे अर्ज तयार करून योजना प्रभावीपणे राबविण्या बाबत योग्य की कार्यवाही पुर्ण करून ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अ.नगर महानगरपालिके मार्फत अपंगांचा सर्व्हे करण्यात आला त्यामध्ये एकुण व्यक्ती ४९४ आहेत या व्यतीरीक्त ज्या दिव्यांगांची नोंद झाली नाही अश्या व्यक्तींची या योजनेचा लाभ घेण्या करीता प्रसिध्दी देवून राहिलेल्या व्यक्तींची नोंद घेण्यात यावी. ही योजना राबविणेकरीता मनपा मध्ये स्वतंत्र्य विभाग निर्माण करण्यात यावा.

ऑफिस रिपोर्ट मधील मुद्दा क्र. १ ते ८ मध्ये नमुद केल्या नुसार अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातील अपंगांसाठी सेवा उपलब्ध करून देण्यात यावी. योजनेच्या सर्व प्रवर्गातील लाभार्थी करीता अटी व शर्ती प्रमाणे अर्ज तयार करून योजना प्रभावीपणे राबविण्या बाबत योग्य की कार्यवाही पुर्ण करून ऑफिस रिपोर्टस ही सभा मान्याता देत आहे.

**ठराव:-** अ.नगर महानगरपालिके मार्फत अपंगांचा सर्व्हे करण्यात आला त्यामध्ये एकुण व्यक्ती ४९४ आहेत या व्यतीरीक्त ज्या दिव्यांगांची नोंद झाली नाही अश्या व्यक्तींची या योजनेचा लाभ घेण्या करीता प्रसिध्दी देवून राहिलेल्या व्यक्तींची नोंद घेण्यात यावी. ही योजना राबविणेकरीता मनपा मध्ये स्वतंत्र्य विभाग निर्माण करण्यात यावा.

ऑफिस रिपोर्ट मधील मुद्दा क्र. १ ते ८ मध्ये नमुद केल्या नुसार अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातील अपंगांसाठी सेवा उपलब्ध करून देण्यात यावी.उपरोक्त योजने करीता निधी कमी पडू नये म्हणून महानगरपालिकेच्या कर वसूलीतून नियमित पणे काही प्रमाणात निधी सदर योजनेच्या नवीन बॅक खात्यामध्ये वर्ग होण्याच्या दृष्टीने मा.उपायुक्त (कर) यांनी नियोजन करून संबंधीत बॅकेस सुचना दयाव्यात. योजनेच्या सर्व प्रवर्गातील लाभार्थी करीता अटी व शर्ती प्रमाणे अर्ज तयार करून योजना प्रभावीपणे राबविण्या बाबत योग्य ती कार्यवाही पुर्ण करण्यात यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर

सुचक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ५**

विषय क्रमांक- ४८ मंगळवार दिनांक २६/९/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.गणेश दगडू शिंदे व श्री.गोपीनाथ भाउराव कवडे यांचे अर्जानुसार त्यांना दिलेल्या जागेचे भाडेकरार वाढवून देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका,मार्केट विभाग.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंतीपुर्वक सादर करण्यात येतो की,भाडेकरार वाढवुन देणेबाबत संदर्भिय अर्ज इकडेस प्राप्त झाले आहे.गाडगीळ पटांगण येथील गाळा क्र.१६/१ लगत उत्तरभिमुख ५x१० चौ.फुट या मोजमापाची जागा दरमहा भाडे रू.२५०/- व अनामत रक्कम रू.१२०००/- घेवून मा.स्थायी समिती ठराव क्र.१२३ दि.१६/१२/१४ अन्वये एक वर्षाकरिता दोन्ही अर्जदारास खुल्या जागा कराराने देण्यात आली होती त्यांच्या कराराची मुदत दि.९/३/१६ रोजी संपली आहे.तथापी मा.महासभा ठराव क्र.२१ दि.३१/८/२०१५ नुसार कराराचे नुतणीकरण करावयाचे झाल्यास भाडे व डीपॉझिट ठरवून घेण्याकरिता मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव अखेर मान्यतेसाठी मा.स्थायी समितीपुढे सादर करणे उचित वाटते सबब आदेशार्थ सादर असा रिपोर्ट सादर केला असता त्यावरमउपायुक्त (कर) यांनी टी.पी.अभिप्राय दयावा असा अभिप्राय दिला.फेरसादर,मा.उपायुक्त (कर) यांच्या मान्यतेने सदरचा प्रस्ताव मार्केट विभाग जा.क्र.४२५ दि.१७/१/१७ अन्वये नगररचना विभागाकडे पाठविला असता त्यांनी अर्जदार श्री.गणेश दगडू शिंदे व श्री.गोपीनाथ भाउराव कवडे यांच्याकडून प्रत्येकी ९.२९ चौ.मी.जागेचे रू.६००/- इतके मासिक भाडे एक वर्ष कालावधीसाठी आकारणे योग्य होईल तसेच अनामत रक्कम रू.३५००/- इतके प्रमाणित करून दिले आहे.तसेच अर्जदार यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार विकास योजनेतील रस्ता विकसीत करतेवेळी देण्यात आलेली रस्त्यापैकी जागा कुठल्याही प्रकारचा अडथळा अथवा न्यायालयीन वाद उपस्थित न करता सदर जागा रस्त्याकरिता खुली करून देण्यात येईल या प्रतिज्ञापत्रावर ११ महिन्याच्या करारावर जागा देणेबाबत खालील भाडेमुल्य व अनामत रक्कमेनुसार देणेस हरकत नाही.असे या विभागाचे मत आहे.असे जा.क्र./भाडेमुल्य व अनामत ठरविणे / एस.के./१२१५ दि.४/३/२०१७ व जा.क्र./भाडेमुल्य वअनामत ठरविणे/एस के दा /१२१६ दि.४/३/२०१७ अन्वये इकडेस कळविले आहे.

तरी सदरचा प्रस्ताव अखेर मान्यतेस्तव व निर्णयास्तव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर केला असता त्यावर मा.उपायुक्त (कर) यांनी प्रस्तावितनुसार विषय मा.स्थायी समितीत सादर करण्यास हरकत नाही त्यावर मा.आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी असे.

येणे प्रमाणे मार्के ट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर फेरसादर ,विनंती पुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येतो की,मा.उपायुक्त (कर) यांच्या मान्यतेने सदरचा प्रस्ताव मार्केट विभाग जा.क्र.४२५ दि.१७/१/१७ अन्वये नगररचना विभागाकडे पाठविला असता त्यांनी अर्जदार श्री.गणेश दगडू शिंदे व श्री.गोपीनाथ कवडे यांच्याकडून ९.२९चौ.मी.जागेचे रू.६००/- इतके मासिक भाडे एक वर्ष कालावधी साठी आकारणे योग्य होईल तसेच अनामत रक्कम रू.३५००/-इतके प्रमाणित करून दिले आहे.तसेच अर्जदार यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार विकास योजनेतील रस्ता विकसीत करतेवेळी देण्यात आलेली रस्त्यापैकी जागा कुटल्याही प्रकारचा अडथळा अथवा न्यायालयीन वाद उपस्थित न करता सदर जागा रस्त्याकरीता खुली करून देण्यात येईल या प्रतिज्ञापत्रावर ११ महिन्याच्या करारावर जाग देणे बाबत खाली भाडेमुल्य व अनामत रक्कमेनुसार देणेस हरकत नाही.असे या विभागाचे मत आहे.असे जा.क्र./भाडेमुल्य व अनामत ठरविणे/ एस.के.दा /१२१५ दि ४/३/२०१७ व जा क्र / भाडेमुल्य व अनामत ठरविणे /एस के दा /१२१६ दि ४/३/१७ अन्वये इकडेस कळविले आहे.

तरी सदरचा प्रस्ताव अखेर मान्येतेस्तव व निर्णयास्तव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) प्रस्तावितनुसाद विषय मा.स्थायी समिती मध्ये सादर करणेस हरकत नाही.मे.आदेशार्थ सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी..यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री.गणेश दगडू शिंदे व श्री.गोपीनाथ भाउराव कवडे यांचे अर्जानुसार त्यांना दिलेल्या जागेचे भाडेकरार वाढवून देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री. सचिन जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.संजय शेंडगे :- प्रस्तावातील जाग कोठे आहे.

मार्केट विभाग प्रमुख श्री.भोसले :- .गाडगीळ पटांगण येथील गाळा क्र.१६/१ लगत उत्तरभिमुख ५X१० चौ.फुट या मोजमापाची जागा आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- किती वर्षाचा करार केला होता.

मार्केट विभाग प्रमुख श्री.भोसले :- ११ महिन्यांचा करार केला होता.

मा.सौ.उषा नलवडे :- अर्जदार यांचे कडून प्रतिज्ञापत्र घेतले आहे काय आहे प्रतिज्ञापत्र.

मार्केट विभाग प्रमुख श्री.भोसले :- अर्जदार यांचे कडून सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार विकास योजनेतील रस्ता विकसीत करतेवेळी देण्यात आलेली रस्त्यापैकी जागा कुटल्याही प्रकारचा अडथळा अथवा न्यायालयीन वाद उपस्थित न करता सदर जागा रस्त्याकरीता खुली करून देण्यात येईल.असे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेची जागा भाडेतत्वावर मिळणे बाबत अर्ज प्राप्त झालेला आहे.या अर्जावर निर्णय घेण्यात यावा. सदर अर्ज सभेमध्ये वाचून दाखविण्यात यावा.

त्या नुसार अर्जाचे सभेमध्ये वाचन करण्यात आले.

मा.सौ.उषा नलवडे :- प्रस्तावातील जागा ११ वर्ष कराराने देण्यास काय हरकत आहे.ज्यावेळी विकास योजनेतील रस्ता विकसीत करतेवेळी देण्यात आलेली रस्त्यापैकी जागा आवश्यकता वाटेल तेव्हा या जागेचा ताबा आपल्याला घेता येईल." कुटल्याही प्रकारचा अडथळा अथवा न्यायालयीन वाद उपस्थित न करता सदर जागा रस्त्याकरीता खुली करून घेण्यात येईल." असे प्रतिज्ञापत्र मनपाने करून घेतले आहे. ११ वर्ष करारावर जागा देण्यात यावी.सभेमध्ये प्राप्त अर्जदार श्री.हेमंत श्रीकिसन पांडे,तांगेगल्ली,अ.नगर यांना स.नं.७४०१ मधील सिटी सर्व्हे नं.६८६५ मधील २०X१५ चौ.फुट जागा व्यावसायासाठी भाडे तत्वावर देण्यात यावी.

मा.सौ.सुनिता भिंगारदिवे :- अर्जदार श्री.गणेश दगडू शिंदे व श्री.गोपीनाथ कवडे यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञा पत्रानुसार विकास योजनेतील रस्ता विकसीत करतेवेळी देण्यात आलेली रस्त्यापैकी जागा कुटल्याही प्रकारचा अडथळा अथवा न्यायालयीन वाद उपस्थित न करता सदर जागा रस्त्याकरीता खुली करून देण्यात येईल या प्रतिज्ञापत्रावर ११ वर्ष करारावर जागा देणे बाबत खाली भाडेमुल्य व अनामत

रक्कमेनुसार देण्यात यावी.प्राप्त अर्जानुसार अर्जदार श्री.हेमंत श्रीकिसन पांडे यांना महानगरपालिकेच्या मालकीची जागा भाडे तत्वावर देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री.गणेश दगडू शिंदे व श्री.गोपीनाथ भाउराव कवडे यांचे अर्जानुसार भाडे करार वाढविणे व सभेमध्ये प्राप्त झालेल्या अर्जानुसार अर्जदार श्री.हेमंत श्रीकिसन पांडे,तांगे गल्ली,अ.नगर यांना स.नं.७४०१ मधील सिटी सर्व्हे नं.६८६५ मधील शेजारील २०x१५ चौ.फुट जागा व्यावसायासाठी भाडे तत्वावर देण्यात यावी. दोन्ही अर्जदारांस सभेमधील चर्चे नुसार त्यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार ११ वर्ष कराराने जागा देणे बाबत आवश्यक ती कार्यवाही पुर्ण करावी.

**ठराव :-** अर्जदार श्री.गणेश दगडू शिंदे व श्री.गोपीनाथ भाउराव कवडे यांचे अर्जानुसार त्यांना दिलेल्या जागेचे भाडेकरार वाढवून देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट नुसार सभेत झालेल्या चर्चे नुसार विकास योजनेतील रस्ता विकसीत करतेवेळी देण्यात आलेली रस्त्यापैकी जागा आवश्यकता वाटेल तेव्हा या जागेचा ताबा महानगरपालिकेस दयावा लागेल व कुटल्याही प्रकारचा अडथळा अथवा न्यायालयीन वाद उपस्थित न करता सदर जागा रस्त्याकरीता खुली करून घेण्यात येईल या अटी वर ११ वर्ष भाडेकरार वाढवून देणेस ही सभा मान्यता देत आहे.व सभेमध्ये प्राप्त अर्ज व चर्चे नुसार अर्जानुसार अर्जदार श्री.हेमंत श्रीकिसन पांडे,रा.तांगे गल्ली,अ.नगर यांना स.नं.७४०१ मधील सिटी सर्व्हे नं.६८६५ मधील शेजारील २०x१५चौ.फुट जागा व्यावसायासाठी ११ वर्ष करीता कराराने भाडे तत्वावर देण्यास ही सभा मान्यता देत आहे. या बाबत कार्यालयीन सोपस्कार संबंधीत विभागाने तात्काळ पुर्ण करावेत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ. उषा नलवडे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सुनिता भिंगारदिवे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ५**

विषय क्रमांक- ४९ मंगळवार दिनांक २६/९/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ नुसार महानगरपालिकेच्या माध्यमिक विदयालया मधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** आस्था/कार्यासन विभाग.

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की,मा.महासभा ठराव क्र.४ दिनांक २५-६-०८ अन्वये मा.शासनास महानगरपालिकेच्या वतीने कायम विना अनुदानीत तत्वावर १. माध्यमिक शाळा (वर्ग ) प्रायोगिक तत्वावर सुरू करावे या बाबत माहिती सादर करावी व सदरच्या खर्चासाठी मा.शासनाचे विशेष अर्थ सहाय्य उपलब्ध होणेकरिता पाठपुरावा करण्यात यावा असा ठराव मंजुर करण्यात आलेला आहे.

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.नमाशा/०९(४९७/०९) माशि-१ दिनांक ११ जुन २००९ अन्वये इयत्ता आठवी ते बारावी वर्ग सुरू करण्यास शासनावर कोणताही आर्थिक भार येणार नाही या अटी नुसार मान्यता देण्यात आली आहे.मा.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,पुणे जा.क्र.शिउसा/माध्य./३/१५/प्र.भा/पु.वि./२०१२/०२ दिनांक २३-८-२०१२ ला तात्पुरत्या स्वरूपात मान्यता देणेबाबत जिल्हा परिषद,अहमदनगर यांना कळविले आहे.त्यानुसार जिल्हा परिषद,अहमदनगर यांनी दिनांक १२/५/२०११० चे पत्रानुसार माध्यमिक विदयालय सुरू करण्यासाठी कळविले आहे.तसेच पत्र क्र.जा.क्र.कार्या /६/सेसनी/समक्ष/२०१२ दिनांक १८/१०/२०१२ रोजीचे पत्रान्वये शिक्षक व शिक्षकेतर सेवक संच निश्चितीस मान्यता दिलेली आहे.त्यामध्ये मुख्याध्यापक -१.शिक्षक-४ कनिष्ठ लिपिक -१ व शिपाई -१ अशा सात पदांना मंजुरी देण्यांत आलेली आहे.अहमदगनर महानगरपालिकेच्या आकृतीबंध व सेवाप्रवेश नियमावलीस मा.शासनाकडून दिनांक ६ फेब्रुवारी २०१६ रोजी मान्यता मिळालेली आहे.सदरहु सेवाप्रवेश नियम व आकृतीबंधामध्ये माध्यमिक शिक्षण विभागासाठी कोणत्याही पदांना मंजूरी मिळालेली नाही.

महापालिका माध्यमिक विद्यालयासाठी मा.शिक्षण अधिकारी (माध्यमिक ) जिल्हा परिषद,अहमदनगर यांनी मंजुर केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर संचास व सदर मान्यता घेण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ नुसार मा.स्थायी समिती व महासभेच्या मंजुरीकरीता मा.शासनाकडून अंतिम मंजुरीस प्रस्ताव सादर करावा लागेल.उपरोक्त माध्यमिक विद्यालयासाठी सदर कर्मचा-यांना सेवेत समाविष्ट करून घेतल्यास सदर शाळेचा व कर्मचा-यांचा संपुर्ण खर्च (वेतन भत्ते व इत्यादी ) महानगरपालिकेला सोसावा लागेल.

तरी खालील तक्त्यांत दर्शविलेनुसार शिक्षक व शिक्षकेतर संचास व सदर मान्यता घेण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ नुसार मा.स्थायी समिती व महासभेच्या मंजुरीकरिता मा.शासनाकडेस अंतिम मंजूरीस प्रस्ताव सादर करणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

| अ.नं. | पदनाम | पदे | शैक्षणिक अर्हता | वेतनश्रेणी | सर्वसाधारण मासिक वेतन | वार्षिक वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्याध्यापक | १ | कोणत्याही शाखेची पदवी धारण करणे आवश्यक व बी.एड पदवी आवश्यक,शिक्षक पदावर ३ वर्ष सेवेचा अनुभव | ९३३४-३४८०० GP४४०० | ३२,२७५/- | ३,८७,३००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | शिक्षक/सहाय्यक शिक्षक | ४ | बीए,बी.कॉम /बीएस.सी,बी.एड,डी.एड | ९३३४-३४८०० GP४३०० | ३२,०४०/- | ३,८४,४८०/- |
| ३ | लिपिक/टंकलेखक | | एस.एस.सी.उत्तीर्ण,राज्य शासनाची मराठी (जी.सी.सी) टंकलेखन ४० श.प्र.मि.परिक्षा उत्तीर्ण,एम.एस.सी.आय.टी .उत्तीर्ण किंवा डी ओ ई ए सी सी सोसायटीच्या अधिकृत सी सी सी किंवा ओ स्तर किंवा सी स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक | ५२००-२०२०० GP१९०० | १६,६८५/- | २,००,२००/- |
| ४ | शिपाई | | ७ वी उत्तीणर्,मराठी लिहीता वाचता व बोलता येणे आवश्यक | ४४१०-७४४० GP १३०० | १३,४८९/- | १,६१,८६८/- |

येणे प्रमाणे प्रभाग अधिकारी तथा आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.
यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, अ मान्यतेस्वत सादर
यावर अति.आयुक्त व आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,अ.नगर जि.प. शिक्षण विभाग यांचे अ.नगर यांचे पत्र दि.१८/१०/२०१२ अन्वये पदाचे शैक्षणिक अर्हता मार्गदर्शन योग्य राहिल.
यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,उपरोक्त आपले शेरांकनाप्रमाणे पुर्तता पा.क्र.७९ ते ९७ पर्यत करण्यात आली आहे.तरी पुढील कार्यावाही करणेस हरकत नाही.

मा.शिक्षणअधिकारी यांचे अभिप्रायानुसार कार्यवाही करणे योग्य राहिल.

यावर अतिरिक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,उपरोक्त विषयांकित प्रकरणी मनपा विधीतज्ञांचे अभिप्रायासह फेरसादर करावे.
येणे प्रमाणे प्रभाग अधिकारी तथा आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,फेरसादर,विनंती रिपोर्ट की,मा.अतिरिक्त आयुक्त यांचे दिनांक २९/०४/२०१७ रोजीच्या शेरांकनानुसार मनपा विधितज्ञ ॲड.श्री.के.एन.लोखंडे यांना जा.क्र.६७१ दिनांक १/६/२०१७ रोजी दिलेल्या पत्रानुसार त्यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

उपरोक्त माध्यमिक विद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी वेतन व इतर मागण्यांबाबत याचिक केली होती.सदर याचिका प्रकरणी मा.आयुक्त साहेब यांना तो आदेश पारित करण्याबाबतचे

ना.हायकोर्ट खंडपीठ,औरंगाबाद यांनी रिट अर्ज क्र.७८३८/२०१४मध्ये पारित करण्यात आले होते.सदर आदेशाप्रमाणे मा.आयुक्त साहेब यांनी दिनांक १०/५/२०१६ रोजी सविस्तर निर्णय देवून सदरच्या पदांना मान्यता मिळणेबाबतचे प्रस्ताव राज्य शासनाच्या शिक्षण विभागाचे सक्षम प्राधिकृत अधिका-याकडे सादर करण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत.तसेच सदरचे आदेश मान्यता मिळेपावेतो उपरोक्त कर्मचा-यांना हंगामी स्वरूपात नियुक्ती चालू ठेवण्याबाबतचे आदेश दिले तसेच राजेश दगडू मोरे व इतर यांनी दाखल केलेले रिट अर्जामध्ये मा.आयुक्त यांच्यावतीने शपथ पत्र दाखल करण्यात आलेले आहेत व सदरचे शपथपत्र सादरच्या पदांना मान्यता मिळण्याबाबत महानगरपालिकेच्यावतीने योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.याबाबतचे शपथपत्र देण्यात आलेले आहे.सबब मा.आयुक्त साहेब यांनी पारित केलेले आदेशाप्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर संचास मान्यता घेण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करावा सदर मान्यता मिळण्यास वेळ लागेल तोपर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ ते ५३ नुसार मा.स्थायी समिती व
महासभेच्या मंजूरीप्रमाणे उपरोक्त माध्यमिक विद्यालयातील कर्मचारी द्यावे लागणारे वेतन व भत्ते बाबतची मंजुरी कलम ५१ नुसार मा.स्थायी समिती व महासभेकडुन घ्यावी.

तरी प्रस्तावीत करण्यात आलेल्या (पृष्ट क्र.१८ व १९ ) तक्त्यानुसार शिक्षक व शिक्षकेतर संचास व सदर मान्यता घेण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ नुसार मा.स्थायी समिती व महासभेच्या मंजुरीकरिता मा.शासनाकडे अंतिम मंजुरीस प्रस्ताव सादर करण्यास प्रशासन अधिकारी ,मनपा शिक्षण मंडळ यांच्यामार्फत पाठविण्याबाबत आदेशार्थ व निर्णयास्तव आदेशार्थ सादर.
यावर मा.उपायुक्त व अतिरिक्त आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.
यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शाक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ नुसार महानगरपालिकेच्या माध्यमिक विदयालया मधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री. सचिन जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावाची माहिती सांगा.

शिक्षण मंडळ विभाग प्र.प्रशासन अधिकारी श्री.पठाण :- महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजुरी मिळणे बाबत विषय आहे. अहमदनगर महानगरपालिका संचलीत महानगरपालिका माध्यमिक विद्यालय रेल्वे स्टेशन रोड या माध्यमिक शाळेस माध्यमिक शाळा चालविणे करीता मा.शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे. माध्यमिक शाळेस मान्यता प्राप्त झाल्यानंतर पदनिर्मीती होणे आवश्यक असल्याने सदरचा विषय मा.स्थायी समिती च्या मान्येते करीता ठेवण्यात आला आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- या मंजूरी नंतर लगेच पदनिर्माण होणार आहेत का?

शिक्षण मंडळ विभाग प्र.प्रशासन अधिकारी श्री.पठाण :- मा.स्थायी समितीची मंजूरी मिळाल्यानंतर सदरचा विषय मा.महासभेकडे मंजूरीस्तव जाणार असून त्यानंतर मा.राज्य शासनाच्या मंजूरीस्तव जाणार आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट नुसार महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजूरी देवून मा.महासभेच्या मंजूरी करीता पाठविण्यात यावा.

मा.सौ.उषा नलवडे :- ऑफिस रिपोर्ट मान्य करण्यात यावा, महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजुरी देण्यात येवून महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम कलम ५१ नुसार महासभेकडे पाठविण्यास मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- सभागृहात झालेल्या चर्चे नुसार महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजुरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.तसेच महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम कलम ५१ नुसार मा.महासभेकडे पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** सभागृहात झालेल्या चर्चे नुसार महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजुरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.तसेच महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम कलम ५१ नुसार प्रस्तुत कार्यवाहीस धोरणात्मक बाब असल्याने मा. महासभेची मंजूरी घेणेबाबत संबंधित विभागाने सदरची कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ५

विषय क्रमांक- ५०                                                                 मंगळवार दिनांक २६/९/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे करीता पुर्व मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** आस्थापना विभाग.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र. ४४१ दिनांक १५/७/२०१७ व जा.क्र ४८३ दिनाक २७/७/२०१७ अन्वयेचा प्रस्ताव. सादर करुन त्यामध्ये " दि १०/०२/२०१७ रोजी संदर्भीय आदेशा नुसार अहमदनगर महानगरपालिकेमध्ये पाणी पुराठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारनुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता ( सिव्हील ) पदांवर दि १०/०२/२०१७ रोजी पासुन ६ महिन्याकरीता निर्देशीत अटी शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणुका करण्यांत आलेल्या आहेत . नियुक्त केलेले सर्व कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या विभागाकडे हजर झाल्यानंतर नेमणुकीस असुन कार्यरत आहे.

परंतु कंत्राटी करारानुसार नेमणुक केलेल्या कर्मचा-यांची मुदत दि १३/०८/२०१७ रोजी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे मुदतवाढ मिळणे कामी खालील नमुद कर्मचारी यांनी दि १९/०६/२०१७ व १८/०७/२०१७ रोजी इकडेस विनंती अर्ज दिलेला आहे.

| अ.क्र | कर्मचा-याचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | सौ.स्नेहल राजेंद्र मुळे | कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) |
| २ | श्री .विशाल गोरख शिंदे | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) |

या अनुषंगाने मा.आयुक्त यांचे संदर्भिय पारीत आदेशानुसार पाणी पुरवठा विभागाकरीता मोठ्या प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) पदांवर नमुद कर्मचा-यांना नियमानुसार दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन मुदतवाढ देणे संयुक्तीक वाटते असे नमुद कलेले असुन मा.उपायुक्त (सा) उपरोक्त नुसार मान्यतेस्तव सादर" असा अभिप्राय दिलेला आहे.

तरी १) सौ.स्नेहल राजेंद्र मुळे २) श्री विशाल गोरख शिंदे , यांचा जा क्र आस्था ६७४७ दिनांक १०/०२/२०१७ अन्वये दिनांक १०/०२/२०१७ ते १२/०८/२०१७ अखेर तात्पुरत्या नियुक्तीचा कालावधी दिनांक १३/०८/२०१७ रोजी समाप्त झालेला असुन जा.क्र. पाणी पुरवठा ४४१,४८३ दिनांक १५/०७/२०१७,२७/०७/२०१७ रोजीच्या अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेसाठी करार नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ या पदी १) सौ.स्नेहल राजेंद्र मुळे , २) श्री विशाल गोरख शिंदे तिन दिवसाचा तंत्रिक खंड देवुन दिनांक १६/८/२०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये २०,०००/- या दरमहा माधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत मा.मुख्य लेखा परिक्षक व मा.मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णया साठी सादर करणेस प्रस्ताव मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे प्र.सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,मुलेअ व मुलेप मार्फत सादर करावे.
यावर मुख्यलेखाअधिकारी यांची स्वाक्षरी.
यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कार्यवाही करणे उचित ठरेल.
यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.
यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे करीता पुर्व मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.सचिन जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्रीमती कलावती शेळके :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ४३,४४,५० हे पुर्ननियुक्ती असून या विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सौ.उषा नलवडे :- सर्व पुर्ननियुक्ती करणे बाबतचे विषयास मंजूरी देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- विषय क्र.४३,४४,५० हे विषय अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदगनर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करार नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ या पदी १) सौ.स्नेहल राजेंद्र मुळे , २) श्री विशाल गोरख शिंदे यांना तीन दिवसाचा तंत्रिक खंड देवुन दिनांक १६/८/२०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये २०,०००/- या दरमहा माधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्रीमती कलावती शेळके सही /-

अनुमोदक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका